# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/10/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर बॅक ऑफ इंडिया ए.टी.एम. जवळ बुटीबोरी येथे दिनांक 06/10/2021 चे 19.00 वा. ते 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शांतीलता चक्रधर बेहेरा वय 40 वर्ष, रा. विरसावरकर नगर फेज 2 प्लॉट नं. 283 बुटीबोरी ही बुटीबोरी मार्केट मध्ये दुकानातुन पुजेचे सामान खरेदी केले व दुकानातील महिलेला पैसे देत असतांना फिर्यादीच्या गळयातील सोन्याची चैन किंमत 52,000/–रु. मागुन 2 अज्ञात आरोपीतांनी जोराने खेचली. तेव्हा फिर्यादी या जोरात चोर चोर म्हणुन ओरडल्या व मागे वळून पाहिले असता दोन अनोळखी व्यक्ती त्यात एकाने पांढऱ्या रंगाचा शर्ट घातलेला होता व दुसरा व्यक्ती असे दोघेही आपल्या मोटरसायकलवर बसून बुटीबोरी उडाणपूल कडे पळून गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मोरखेडे पो.स्टे. बोरी मो. क्रं. 8208751249 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :– फिर्यादी/पीडित वय 21 वर्ष हिला आरोपी नामे– गजानन दारोटे रा. वडोदा एकटीला पाहुन नेहमी छेडखानी करीत होता. दिनांक 05/10/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादीचे आई वडील मतदान करण्याकरीता गेले असता फिर्यादी ही शेतातील झोपडीत एकटीच हजर असता यातील आरोपी हा तेथे आला व पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 425, 354 (ब) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल मो.क्र. 9823168964 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावरील खापरी मोरेश्वर येथे दिनांक 06/10/2021 चे 13:30 वा. ते 14.00 वा. दरम्यान पवन कंठीराम गोडबोले(मृतक), वय 36 वर्ष, रा. खापरी मोरेश्वर हा गावातील मंदीराच्या ओटयावर बसला होता समोरच आयसर गाडी एमएच– 40/वाय– 0750 उभी होती. गाडीचा ड्रायव्हर सुमीत सावरकर याने गाडीलाच चाबी लावली होती व तो कनडॅक्टर सिटवर बसुन फिल्टर साफ करीत होता व ड्रायव्हर सिटवर आरोपी नामे– उमाकांत गणेश सावरकर, वय 26 वर्ष, रा. खापरी मोरेश्वर बसला होता. यावर आरोपीने गाडीची चाबी सुरु केली व गाडी गेअर मध्ये असतांना गाडी समोर सरळ बसलेला पवन याला जाउन धडकली. पवन याच्या डोक्याला जबर मार लागला व रक्त निघुन लागले यावर त्याला त्वरीत दवाखण्यात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले. उमाकांत सावरकर हयाचे हलगर्जीपणाने पवन हयाच्या मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कंठीराम नारायण गोडबोले, वय 65 वर्ष, रा. खापरी मोरेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विनोद ठाकरे 9923466728 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा धापेवाडा येथे दिनांक 05/10/2021 चे 09:30 वा. दरम्यान महेंद्र उर्फ गुड्डु सुरज खंडाते (मृतक) वय 25 वर्षे रा. जामरापाणी घनौली ता कुरई जि शिवनी मध्य प्रदेश ह. मु. बोरगाव शिवार हा धापेवाडा येथे दारू पिण्याकरीता गेला असता दारू पिउन तो बोरगावचे साईडवर धापेवाडा वरून पायी परत येत असतांना अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहान भरधाव वेगाने निष्काळजीपणे लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे आपले वाहन चालवून मृतकला धडक दिली. महेंद्र खंडाते हा सदर अपघातामध्ये मरण पावला. अज्ञात वाहन चालक याने मृतकला सोडुन सदर घटनेबाबत पोलीसांना सुचना न देता घटनास्थळा वरून आपले वाहन घेवून पडुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– इरफान तुराब शेख वय 40 वर्षे रा वार्ड क्र 15 एमआयडीसी कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134(ए), 134(बी),177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री सागर कारंडे पोस्टे सावनेर मो.क्र. 7722011228 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत गरडापार शिवार गोसावी टेकडीचे पायथ्याशी येथे दिनांक 06/10/2021 चे 08:00 वा. ते 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे– भगवान सितारामजी वंजारी (मृतक) वय 57 वर्षे रा बोटेझरी हे त्याचे ताब्यातील वाहन उमरेड गावातुन काही काम आटपवुन परत गावाकडे येत असतांना गरडेपार ते बोटेझरी शिवारातील गोसावी टेकडीचे पायथ्याशी असेलेल्या दगडी रस्त्यातुन भरदाध वेगाने निष्काळजीपणे चालवुन वाहन दगडावरून उसळल्याने चालकाचे वाहणाचे स्ट्रेरिंग वरील संतुलन बिघडुन दगडी जमिनीवर पडला. ज्यामुळे चालक हा स्वतःहा चालवित असलेल्या लाल रंगाचा ट्रॅक्टर बिना नंबर प्लेट असलेला मेसी फरगुसन कंपनिचे चक्याचे खाली दबुन स्वतःहा गंभीर जखमी होवुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा आाषीश खोडे पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री राजेश पाटील मो.क्र 904998341 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर